प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
जाहीर नोटीस, दिनांक : ३१/०७/२०२६

विषय - जिल्हा अभिलेखागार बुलडाणा येथील नाश केलेल्या फाईल्स रद्दी म्हणून विक्री करण्यासाठी नविन निवीदा मागविणेबाबत.

पहा - ०१. दिनांक २१/०७/२०२६ रोजीची कार्यालयीन टिप्पणी व त्यावरील पारीत आदेश.
०२. दिनांक ३०/०७/२०२६ रोजीची कार्यालयीन टिप्पणी व त्यावरील पारीत आदेश.

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच कार्यालय, बुलडाणा येथील जिल्हा अभिलेखागारामधील दिवाणी व फौजदारी विभागाच्या निकाली निघालेल्या मुदतबाहय नाश केलेल्या ब,क,ड फाईल्सची रद्दी विक्री करण्यासाठी पुन्हा नवीन निवीदा मागविण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये रद्दी खरेदीदाराकडून प्राप्त झालेल्या सिलबंद निवीदा उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार रद्द करुन आज रोजी पुन्हा नवीन निवीदा ईच्छुक खरेदीदाराकडून खालील दिलेल्या अटीवर मागविण्यात येत आहेत.

०१. रद्दी ही सरसगट एकाच प्रकारची असेल.

०२. रद्दी भरण्याकरीता लागणारे कट्टे हे खरेदीदार यांनी पुरविण्यात यावे.

०३. खरेदीदार यांनी सदरची रद्दी १५ दिवसाचे आत आपल्या व्यक्तीकडून फाडून न्यायालयातील आवारात मोजणी करून उचल करुन न्यावी.

तरी इच्छूक खरेदीदारांनी आपल्या सिलबंद निवीदा मा. जिल्हा न्यायालय, बुलडाणा या नावाने सिलबंद पाकीटात दिनांक **०७.०८.२०२६** चे सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालयात सादर कराव्यात. निर्धारित कालावधीनंतर येणा-या निवीदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच जास्तीत जास्त दराची निवीदा खरेदी विक्री समितीद्वारे स्वीकृत केल्यानंतर निवीदाधारकास कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच विक्री प्रक्रिया केव्हाही रद्द करण्याचे सर्व हक्क मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

आदेशावरुन

३१.७.

प्र. प्रबंधक

दिनांक - ३१.०७.२०२६.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा